"शिक्षक प्रशिक्षण" या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करण्याबाबत...
लेखाशिर्ष केंद्र हिस्सा (२२०२ आय १६५) आणि राज्य हिस्सा (२२०२ आय २५४).

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी २०१८/प्र.क्र.४/कार्यासन ६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२
तारीख: - २६ मार्च,२०१९.

वाचा -

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.
२) मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकारचे पत्र क्र.एफ नं.७-२/२०१८-आयएस-१२(एसटी), दि.११.०९.२०१८
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग समक्रमांक दि.१६.०१.२०१९
४) शालेय शिक्षण विभाग, नस्ती क्र. अनुवि- २०१८ /१४४/१८ / प्रशिक्षण.

शासन निर्णय-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, जनजाती क्षेत्र उपयोजना, ०१, प्राथमिक शिक्षण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, (०१) (०४) शिक्षकांना प्रशिक्षण, केंद्र हिस्सा (२२०२ आय १६५) या लेखाशिर्षाखाली रु.४४९.०८ लाख तर (०१) (०५) शिक्षकांना प्रशिक्षण, राज्य हिस्सा (२२०२ आय २५४), या लेखाशिर्षाखाली रु.२९९.३८ लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.सदर तरतुदीतून संदर्भीत वाचा क्र.३ येथे नमूद शासन निर्णयान्वये लेखाशिर्ष (२२०२ आय १६५) खाली रु.१८३.५१ व लेखाशिर्ष (२२०२ आय २५४) खाली रु.१२२.३४ लाख इतका निधी शालेय शिक्षण व क्रीडा विभागास वितरीत करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने उपरोक्त योजनेसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता पहिल्या हप्त्यातील उर्वरित केंद्र हिस्सा म्हणून रु. २८.३० लाख इतका निधी वितरीत केलेला आहे. त्यानुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने वाचा क्र. ४ येथील नस्तीवर प्रस्तावित केल्यानुसार (०१) (०४) शिक्षकांना प्रशिक्षण, केंद्र हिस्सा (२२०२ आय १६५), या लेखाशिर्षाखाली रु.२८.३० लाख (अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख, तीस हजार फक्त) इतका निधी व त्यास समरुप राज्य हिस्सा (०१) (०५) शिक्षकांना प्रशिक्षण, राज्य हिस्सा (२२०२ आय २५४), या लेखाशिर्षाखाली रु.१८.८७ लाख (अक्षरी रुपये अठरा लाख, सत्त्याऐंशी हजार फक्त) असा एकूण रु.४७.१७ लाख (अक्षरी रुपये सत्तेचाळीस लाखख् सतरा हजार फक्त)इतका निधी प्रशासकिय विभाग प्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. विभागप्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार सदर निधी याच वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर

आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. १३५ / अर्थोपाय , दि.१६.०३.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५११०३४९३६२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.26 14:11:02 +05'30'

रविंद्र दि. औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ नागपूर/ अमरावती.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग (अर्थ-१९) / (व्यय-१४) मंत्रालय, मुंबई
८. कक्ष अधिकारी (कार्यासन ११) /निवडनस्ती (कार्यासन- ०६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई